


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : ७७८. वा मंगळवार दि. २१ मे २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# आता २३ कोटींच्या खरेदी प्रकरणी ही झाला मोठा झोल...

## तडस यांनी कंत्राटदाराला आगाऊ रक्कम दिल्याचा आरोप...

जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराची गाथा काही केल्या संपता संपत नसल्याचे दिसून येत आहे. जिल्हा रुग्णालयात पुन्हा एकदा २३ कोटी रुपयांच्या साहित्य खरेदी प्रकरणी मोठा झोल झाल्याचे समोर आले आहे. यामध्येही तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नितीन तडस यांनी अनियमितता केल्याचा आरोप आहे. दरम्यान, या संपूर्ण भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी एका समितीचे गठन करण्यात आले असून, यामुळे जिल्हा रुग्णालय प्रशासनात खळबळ उडाल्याचे बोलले जात आहे. येथील जिल्हा रुग्णालयात झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी तक्रातकर्ते खरात व काही समाजसेवक तसेच दैनिक जनसंचलन सिटी न्यूज गेल्या अनेक महिन्यांपासून आवाज उठवत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी न होता हा संपूर्ण भ्रष्टाचार दडपून टाकण्यासाठी वरिष्ठ स्तरावरून प्रयत्न होताना दिसून येत आहेत. कारण वारंवार चौकशी समित्या लावून ही चौकशी रेंगावळवण्याचे काम होताना दिसून येत आहे. या संपूर्ण भ्रष्टाचाराची चर्चा होत असतानाच आता पुन्हा एक नव्या २३ कोटी रुपयांच्या मॉड्यूलर ओटी व लेबर रूमचा २३ कोटी रुपयांचा घोटाळा समोर आला आहे. या माध्यमातून तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांचा आणखी एक झोलझाल समोर आलेला आहे. डॉ. नितीन तडस व भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे

पोस्टमार्टम ८८

यांनी इतर विविध प्रकारचे भ्रष्टाचार तर केलेलेच आहेत, शिवाय या भ्रष्टाचाराची चौकशी होऊ नये, म्हणून सातत्याने चौकशी रेंगाळत ठेवण्याचा प्रयत्न केला. एव्हढेच नाही तर चौकशीत भ्रष्टाचार बाहेर येऊ नये म्हणून त्यांनी वारंवार आपल्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांची पायमल्ली केली. हा नालायकपणा करताना डॉ.तडस व बोथेनी एखाद्या लबाड कोल्ह्याची कातडी पांघरली होती की काय, असा संशय आता येऊ लागला आहे. २३ कोटी रुपयांच्या या मॉड्युलर ओटी व साहित्य खरेदी प्रकरणात देखील डॉ. तडस व बोथे यांनी बरीच बदमाशी केल्याचे दिसून येत आहे. किमान ज्या तक्रारदाराने तक्रार केली, त्यानुसार तरी असे दिसून येत आहे. तक्रारदार खराय यांचा आरोप आहे की, डॉ.तडस यांनी २३ कोटी रुपयांचे हे कंत्राट सन २०२२-२३ मध्ये कुठलीही निविदा न काढता त्या इमानदार कंत्राटदाराला प्रदान केले. याचा अर्थ स्पष्ट आहे की, डॉ. नितीन तडस सह भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांनी आपण भाऊ भाऊ भ्रष्टाचार करून मिळून खाऊ नियमांची पायमल्ली केली. एव्हढेच नव्हे तर डॉ. नितीन तडस हे कंत्राटदारावर एव्हढे इमानदारीने अतिरेकी मेहेरबान होते की, त्यांनी या कामाची एकूण कामाची ८० टक्के

**तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रेमचंद पंडित व डॉ. नितीन तडस सह भांडारपाल प्रभारी,तत्कालीन यांच्या वादग्रस्त कार्यकाळात केलेल्या करोडो रुपयांचा भ्रष्टाचार व त्यातून जमवलेली चल अचल संपत्ती / अपसंपदा ही व्याजासह शासन तिजोरीत जमा करून त्यांच्यावर फोजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल होत नाही आमचा हा पाठपुरावा असाच सुरू राहणार**

कोट्यवधी रक्कम ही कंत्राटदारास आगाऊ दिली. ही रक्कम मिळाल्यानंतर नेहमी प्रमाणे कंत्राटदाराने ढिसाळपणा केला असण्याची दाट शक्यता आहे. हे काम कितपत पूर्ण झाले, याची सविस्तर माहिती येत्या काही काळात खुलाष्यासह समोर येईलच. परंतु डॉ. तडस हे संबंधित कंत्राटदारावर एव्हढे कसे कुणाच्या बोलण्यावर मेहेरबान झाले, (हम अंदर की खबर रखते है ) हाच मोठा प्रश्न आहे. आता हे वेगळे सांगण्याची गरज नाही की, डॉ. नितीन तडस यांनी थेट किंवा कुणाच्या मदतीने कंत्राटदाराशी संगमनत करून हा भ्रष्टाचार केलेला आहे. एकीकडे इतर भ्रष्टाचाराच्या प्रकरणांची प्रकरणे दाबायची आणि दुसरीकडे घोटाळ्यांवर घोटाळे करीत जायचे, हाच किता डॉ. तडस यांच्या कार्यकाळात सातत्याने गिरवल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या घोटाळ्यासंदर्भात संबंधित तक्रारदार खरात वरिष्ठांपर्यंत हे प्रकरण नेले. त्यानंतर वरिष्ठ अधिकारी खडबडून जागे झाले व त्यांनी या प्रकरणाची




चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार नुकतेच एका चौकशी समितीचे गठन करण्यात आले आहे. या समितीच्या चौकशीत सत्य बाहेर येईल, अशी अपेक्षा सर्व बुलढाणेकर करीत आहेत. परंतु या संपूर्ण विषयावरून हे स्पष्ट होते की, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नसानसात भ्रष्टाचाराचा विषाणू भिनला असून, भ्रष्टाचाराचा हा विषाणू काढून टाकल्याशिवाय जिल्हा रुग्णालयाचे आरोग्य सुधारणार नाही. त्यासाठी डॉ. नितीन तडस आणि त्यांच्या भ्रष्टाचारी बगलबच्च्यांवर कारवाई करणे गरजेचे आहे. ही कारवाई जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने लढा देत राहणार आहे.

अजुन बरेच काही पुढील भागात...

# उद्योजक गोविंद अग्रवाल सौ दीपा अग्रवाल अनुप अग्रवाल यांची केली १ कोटी ५४ लाख रुपयांनी फसवणूक

## संबंधित संचालक मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी

जनसंचलन/ चिखली

महाराजा अग्रसेन खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिति चिखली अंतर्गत उद्योजक गोविंद अग्रवाल सौ दीपा अग्रवाल अनुप अग्रवाल यांची महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या अकोला कारंजा लाड जिल्हा वाशिम यांनी १ कोटी ५४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे त्यामुळे चौकशी होऊन संबंधित संचालक मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. अग्रवाल हे शासनमान्य महाराजा अग्रसेन खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिति चिखली चे संस्थापक अध्यक्ष आहे. महाराजा अग्रसेन खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिति चिखली अंतर्गत उद्योजक गोविंद अग्रवाल दीपा अग्रवाल अनुप अग्रवाल यांची महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्यादित अकोला कारंजा लाड जिल्हा वाशिम यांनी विश्वासघात करून त्यांची तब्बल एक कोटी ५४ लाख रुपयांनी आर्थिक फसवणूक केली आहे त्याबाबत उद्योजक गोविंद अग्रवाल यांनी ४ एप्रिल २०२४ रोजी चिखली शहर पोलीस स्टेशन यांच्याकडे रेसर तक्रार केली मात्र त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे सदर प्रकरणाची तक्रार ही जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे सुद्धा करण्यात आली होती मात्र त्यानंतर सुद्धा ही कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे आता थेट राज्याचे गृहमंत्री तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे तक्रार करण्यात आली. त्यामुळे शेतकरी व्यापारी व उद्योजक यांच्या मनामध्ये संभ्रम व गैरसमज निर्माण होत आहे व त्याचा परिणाम हा उद्योजकावर होत आहे तरी सदर निवेदना द्वारे वरील संपूर्ण प्रकरणावर गांभीर्याने विचार करून उद्योगाची झालेल्या फसवणुकीची चौकशी होऊन फौजदारी कारवाई करण्यात यावी.




न्याय न मिळाल्यास तहसील कार्यालय चिखली येथे ५ जून पासून उपोषणाला बसणार आहे त्याचे होणारे परिणामाचे सर्वस्व जबाबदारी ही प्रशासनावर राहील असा इशारा यावेळी अग्रवाल यांनी दिला आहे

# रेती तस्करीचा दीड महिन्यांपूर्वीचा गुन्हा; आरोपी निष्पन्न होऊनही मोकाटच !

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

अवैध रेती तस्करी प्रकरणी जमावावर गुन्हा दाखल होतो. त्यानंतर रेती तस्करी रोखण्यासाठी रस्ते खोदून बंद करण्यात येतात. जमावातील निष्पन्न झालेल्या त्या आरोपींवर कारवाई करा म्हणून महसूल उपविभागीय अधिकारी निर्देश देतात. मात्र तरीही पोलिस यंत्रणा ढिम्मच असल्याचे अफलातून चित्र तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे. तालुक्यातील निमगाव वायाळ येथे २६ मार्च रोजी खडकपूर्णा नदी पात्रातून ४० ते ४५ मजूर अवैध रेती उत्खनन करुन चार ट्रॅक्टरमध्ये भरत असल्याची खबर महसूल यंत्रणेला मिळाली. त्यावर कारवाई करण्यासाठी प्रतिबंधक टीम तेथे पोहोचली. मात्र टीम पोहोचल्यावर त्यांनी व्हिडिओ चित्रण केले. हे चालू असतांनाच रेती भरणारे मजूर व ड्रायव्हर तेथून पळून गेले. त्यानंतर हातात खोदण्या, भरण्याची हत्यारे घेऊन मजूर व ड्रायव्हर परतले. त्यातील तीन ड्रायव्हरांनी पथकातील यशवंत घरजाळे व विष्णू थोरात यांच्या अंगावर ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न करीत, तेथून पळून गेले. चौथे ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न करीत असतांनाच निमगाव ग्रामस्थ व तत्कालीन तहसीलदार सचिन शंकरलाल जैस्वाल हे तेथे पोहोचल्याने तो प्रयत्न फसला. या प्रकरणी तहसीलदार जैस्वाल यांच्या फिर्यादीवरुन अप. नं. ७२/२०२४ कलम ३५३, ३७९, ५०६, १४३, १४७, १४९ भादंवि सहकलम महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७), ४८ (८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचा तपास रमेश गोरे यांच्याकडे सोपवण्यात येतो. एवढे सगळे गंभीर प्रकार झाल्यावर रेती माफियांवर कडक कारवाईचा बडगा उगारला जाईल, अशी अपेक्षा होती. दरम्यान निमगाव वायाळ प्रकरणात विविध माध्यमांतून आरोपींची ओळख पटली जावून सुद्धा त्यांच्यावर अद्यापही कोणत्याही प्रकारची कारवाई केली गेलेली नाही. या बाबतीत एसडीओ संजय खडसे यांनी ठाणेदारांना वेळोवेळी निर्दे श देऊनही काहीच उपयोग झाला नसल्याचेच चित्र आहे.




महसूल व पोलीस दोन्हीही विभाग महाराष्ट्र शासनाचे अविभाज्य अंग असतांनाही, कुणाच्या भरवश्यावर आरोपींना कारवाई केल्या न जाता, उलट खुलेआमपणाने रेती तस्करीची मुभा मिळते? जमावाची रेती तस्करी त्यांच्यावर गुन्हा दाखल होणे, वरीष्ठ निर्देश देत असतांनाही तस्करी पूर्ववत जोमात सुरु असणे, यातून महसूल व पोलीस विभागांचा बेबनाव समोर येतो. हा बेबनाव वाट्याहिस्स्यातून होतोय, की आणखी काही कारणाने होत आहे ? याची वरीष्ठ यंत्रणेने गांभीर्याने दखल घेऊन रेती तस्करीवर प्रतिबंध घालण्यासाठी वेळीच दखल घेणे गरजेचे झाले आहे.

# नांदुरा, मोताळा, मलकापूर, लोणार वसतीगृहातील प्रवेश प्रक्रियेस सुरवात

**जनसंचलन/बुलडाणा**

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अधिनस्त वसतीगृह मागास व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह नांदुरा, लोणार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह मोताळा आणि मलकापूर येथील वसतीगृहातील शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मागासवर्गीयप्रवर्ग निहाय आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, जमाती, आर्थिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या तसेच इतर मागास प्रवर्ग, विशेष मागासप्रवर्ग, दिव्यांग, अनाथ आदी प्रवर्गातील विद्यार्थी प्रवेशास पात्र राहणार आहेत. शालेय, कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयीन, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता नगरपालिकेच्या हद्दीतील शाळा, विद्यालय, महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रथम व द्वितीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थी प्रवेश अर्ज भरण्यास पात्र आहेत. प्रवेश अर्ज करण्याची अंतिम दि. २५ मे २०२४ असून प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची पहिली यादी दि. ३१ मे २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरावेत. असे आवाहन मोताळा वसतीगृहाचे गृहपाल ए. एस. इंगळे, भ्रमणध्वनी क्रमांक ९४२३७६१४०३, नांदुरा वसतिगृहाचे गृहपाल एस. व्ही. सोनटक्के, भ्रमणध्वनी क्रमांक ८९७५७७८९४९, मलकापूर वसतीगृहाचे गृहपाल ए. एस. इंगळे, भ्रमणध्वनी क्रमांक ९४२३७६१४०३. आधिक माहिती करिता भ्रमनध्वनीवर संपर्क साधावा किंवा प्रत्यक्ष वसतीगृहाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गवताला आग लागल्यामुळे वाहन जळून खाक

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव : गवताला आग लागल्याने एक जुने वाहन जळून खाक झाले. ही घटना स्थानिक घाटपुरी नाका परिसरात रविवारी दुपारी घडली. घाटपुरी नाका परिसरातील गवताला रविवारी दुपारी अचानक आग लागली. ही आग विझविण्यासाठी परिसरातील नागरिकांनी अतोनात - प्रयत्न केले. मात्र, वाऱ्यामुळे आग



न आटोक्यात येत नव्हती. दरम्यान, आगीत डॉ. शांताराम म्हात्रे यांच्या मालकीची एक जुनी गाडी जळून खाक झाल्याचे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा
बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




# महिला वाहकाबरोबर असभ्य वर्तन करत केला विनयभंग...

## गोंधळ घालणाऱ्या प्रवाशाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल

जनसंचलन/ मोताळा

मलकापूरवरून बुलढाणाकडे येत असलेल्या एसटी बसमध्ये एका प्रवाशाने चांगलाच गोंधळ घातला हा प्रवासी एवढ्यावरच थांबला नाही तर महिला वाहकाबरोबर वाद घालून त्यांना मारहाण केली तसेच विनयभंग केला या प्रवाशाचा गोंधळ पाहता चालकाने बस थेट बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात नेली तेथे गोंधळ घालणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक करून बोराखेडी पोलिसांच्या ताब्यात दिले हा धक्कादायक प्रकार १८ मे रोजी सायंकाळी घडला महिला वाहकाने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्या १८ मे रोजी मलकापूरवरून बुलढाणाकडे एमएच ०६ एस ८०४६ बसवर ड्यूटी करीत होत्या दरम्यान मोताळा येथून आरोपी संदीप ईश्वर पाटील रा. आवेजरखेडा, ता. भुसावळ, जि. जळगाव, हा बसमध्ये चढला व आरडाओरडा करू लागला त्याने आपल्याला अश्लील शिवीगाळ केली, गळा दाबून लोटून दिले त्यामुळे,त्या बसच्या सीटवर पडल्याने डोक्याला मुका मार लागला. तसेच सर्व प्रवाशांसमोर वाईट उद्देशाने हात पकडून गळा पकडला.



बसमध्ये इतका राडा झाल्यानंतर चालकाने बस थेट बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात आणली होती. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत बोराखेडी पोलिसांना पाचारण करून बसमध्ये धिंगाणा घालणाऱ्याला त्यांच्या सुपूर्द केले. आरोपी संदीप ईश्वर पाटील विरुद्ध गुन्हा दाखल कण्यात आला.

# पाणीटंचाई निवारण्यासाठी विंधन विहिरींना मंजुरी

जनसंचलन/बुलडाणा

पाणीटंचाई निवारणासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. त्यानुसार ४३ गावासाठी ६१ विंधन विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. पाणीटंचाई निवारणार्थ खामगाव तालुक्यातील ४ गावात, चिखली तालुक्यातील १३ गावात आणि मेहकर तालुक्यातील २६ गावामध्ये ६१ विंधन विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. या गावामध्ये पाणी पुरवठ्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. खामगाव तालुक्यातील हिवरखेड, आवार, कारेगाव बु,, ज्ञानगंगापूर. चिखली तालुक्यातील देउळगाव धनगर, मंगरुळ (इ.), अंत्री खेडेकर, मेरा बु., गुंजाळा, एकलारा, डोंगरशेवली, हरणी, घानमोड, सोमठाणा, खंडाळा (म.), मेहकर तालुक्यातील वरदडा, लोण (ल.), गजरखेड, दुधा, सावत्रा, मारोती पेठ, माळेगाव, जानेफळ, वरवंड, वडगाव माळी, नेमतापूर, दादुलगव्हाण, गणपूर, मोळा, रत्नापूर (मो.), पारडी, घुटी, बोथा, पारखेड, मांडवा स., डोंगर, देउळगाव साकरशा, नायगाव देशमुख, वागदेव, नागेषवाडी, कराळवाडी, जनुना या गावात विंधन विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. यामुळे या गावामधील पाणीटंचाई सुसह्य होण्यास निश्चित मदत मिळणार आहे, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# भेटली नाहीस तर पती, मुलीला ठार मारेन म्हणत विनयभंग

जनसंचलन/मोताळा

एका विवाहितेला हातवारे तथा इशारे करून विनयभंग केल्याची घटना दि. ३० एप्रिल ते १८ मे दरम्यान नांदुरा तालुक्यातील एका गावात घडली आहे. या प्रकरणी महिलेच्या फिर्यादीवरून बोराखेडी पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदुरा तालुक्यातील एका महिलेने पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, गजानन हरी अढाव आणि फिर्यादीच्या पतीची मैत्री होती. आरोपी गजानन अढाव याने फोन



करून फिर्यादीस भेटण्यासाठी बोलावले आणी भेटायला न आल्यास आत्महत्या करण्याची धमकी दिली. दुसऱ्या दिवशी फिर्यादीच्या घरासमोर उभे राहून इशारे केले. विवाहितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे

# चिखली, शेगाव येथील वसतीगृहातील प्रवेश प्रक्रियेस सुरवात

जनसंचलन/बुलढाणा

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अधिनस्त वसतीगृह मागास व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, चिखली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, शेगाव येथील वसतीगृहातील शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मागासवर्गीय प्रवर्ग निहाय आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, जमाती, आर्थिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या तसेच इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग, अनाथ आदी प्रवर्गातील विद्यार्थी प्रवेशास पात्र राहणार आहेत. शालेय, कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयीन, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता चिखली व देऊळगाव राजा येथील नगरपालिकेच्या हद्दीतील शाळा, विद्यालय, महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रथम व द्वितीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थी प्रवेश अर्ज भरण्यास पात्र आहेत. प्रवेश अर्ज करण्याची अंतिम दि. १८ मे २०२४ असून प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची पहिली यादी दि. २५ मे रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरावेत. असे आवाहन चिखली वसतिगृहाचे गृहपाल व्ही. एस. शिंदे भ्रमनध्वनी क्रमांक ९८५०४६४३६ आणि शेगाव वसतिगृहाचे गृहपाल श्रीमती आर. जे. लेंडे भ्रमनध्वनी क्रमांक ९४२०४३३९७४, ९२८४०४११०८ यांनी केले आहे. आधिक माहिती करिता भ्रमनध्वनीवर संपर्क साधावा किंवा प्रत्यक्ष वसतीगृहाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लग्नाच्या मागणीला नाही म्हटले असता चाकू हल्ला करून ३० वर्षीय महिलेला केले जखमी

जनसंचलन/मोताळा

मोताळा तालुक्यातील रोहिणखेड येथील एका तीस वर्षीय महिलेवर चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी आरोपी विरुद्ध धामणगाव बढे पोलिसांनी २० मे रोजी गुन्हा दाखल केला आहे. अबू बकर उर्फ अली मेहमूद शाह (३०) राहणार इकबाल चौक, बुलढाणा,असे या प्रकरणातील आरोपीचे नाव आहे. आरोपी व पीडित महिला एकाच समाजाचे आहेत. ही घटना १९ मे रोजी घडली होती. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी हा त्यांच्या घरी येऊन लग्नासाठी जबरदस्ती करायला लागला होता. पीडित महिलेसह तिच्या आईने विरोध केला असता, आरोपीने पीडित महिलेस मारहाण करून हल्ला केला. यामुळे पीडित महिला गंभीर जखमी झाली. याप्रकरणी धामणगाव बढे पोलिस आरोपीचा शोध घेत असून, ठाणेदार नागेश



जायले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक बबन रामपुरे हे पुढील तपास करत आहेत.

# ट्रॅक्टर उलटून चालक ठार

जनसंचलन/धामणगाव बढे

मोताळा तालुक्यातील कोल्ही गोलार शिवारात ट्रॅक्टर उलटून झालेल्या अपघातामध्ये चालकाचा मृत्यू झाल्याची घटना २० मे रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली. ईश्वर गजानन गाढे (२८) असे या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या चालकाचे नाव आहे.रिधोरा खंडोबा येथील ते रहिवासी होते. नांगरणीसाठी ट्रॅक्टर घेऊन जात असताना २० मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमार ही घटना घडली. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर धामणगाव बढे पोलिस तत्काळ घटनास्थळी पोहचले. ईश्वर त्यांच्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा असल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. घटनेचा पुढील तपास धामणगाव बढे पोलिस करत आहेत.दरम्यान मे महिन्यात शेती मशागतीची कामे वेग घेत असून अलिकडील काळात ट्रॅक्टरद्वारे शेती मशागत करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे शेतीवर काम करणाऱ्या ट्रॅक्टरची संख्या वाढली आहे. परिणामी अपघाताचेही प्रमाण वाढल्याचे एकंदरीच चित्र आहे. बुलढाणा जिल्ह्यात प्रती ग्रामपंचायत २२ ऐवढी ट्रॅक्टरची संख्या आहे.

# चरित्रावर संशय घेऊन पत्नीचा खून करणाऱ्या त्या नराधम आरोपीला मिळाली दुहेरी जन्मठेपेची शिक्षा.

## जिल्हा सरकारी वकील ॲड वसंत भटकर यांच्या प्रभावी युक्तीवादाने गजानन अपराधी सिध्द करण्यात महत्वाची भूमिका




**जनसंचलन/बुलढाणा**

सगळ्यात घातक जर काही असले तर तो राग आहे.रागच्या भरात माणूस काय करणार याचा काही नेम नाही. कुठल्याही थरारावर तो जाउ शकतो.असाच एक प्रकार बुलढाणा शहरात घडला होता. चरित्रावर संशय घेऊन पत्नीचा खून करणाऱ्या त्या नराधम आरोपीला अखेर आज दि २० मे रोजी जिल्हा सत्र न्यायालयाने दुहेरी जन्मठेपेची शिक्षा व १६५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.जिल्हा सरकारी वकील ॲड वसंत भटकर यांच्या प्रभावी युक्तीवाद गजाननला अपराधी आर-ोपी सिद्ध करण्यात महत्वाची भुमिका बजावणारा ठरला आहे. सविस्तर वृत्त असे की त्रिशरण चौकाजवळील स्मशानभूमी जवळ असलेल्या जगदंबा नगरात पूजा उर्फ गीता ही आपल्या आई-वडिलांकडे मुलीसह राहात होती. २०११ मध्ये आरोपी गजानन विश्वनाथ जाधव वय ३५ राहणार जालना याच्यासोबत रीती रिवाजाप्रमाणे लग्न झाले होते लग्न झाल्यानंतर सदर लग्न संबंधापासून आरोपी गजानन पासून पूजा हिला तीन मुली झाल्या आहेत परंतु आरोपी गजानन हा नेहमी पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करीत होता व शारीरिक व मानसिक छळ सुद्धा करीत होता. पूजाचे वडील सुरेश तायडे हे नेहमी पूजा व आरोपी गजानन यांना समज देऊन नांदवयास पाठवत होते. सततच्या त्रासामुळे कंटाळून पूजाही अंदाजे जून २०२१ मध्ये एक ते दीड महिन्यापूर्वी दोन मुलीसह माहेरी आली होती. एक मुलगी हि पतीकडे होती.तर श्रेया आणि श्ती या पुजा सोबत बुलढाणा येथे आल्या होत्या. आरोपी गजानन हा ८ ऑगस्ट २०२१ रोजी संध्याकाळी पत्नीला भेटण्यासाठी जालन्यावरून बुलढाण्याला आला .सासरी जेवण झाल्यानंतर तो मुक्का थांबला.दुसऱ्या दिवशी त्यांचे सासरे सुरेश तायडे,सासू सकाळीच कामानिमित्त बाहेर गेले.तर पुजाची बहिण अश्वविनी सुध्दा बाहेर कामानिमित्त गेली. सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास श्रेया आणि श्ती बाहेर खेळत होत्या.पत्नी घरात एकटीच होती. गजाननच्या डोक्यात भलतीच डाळ शिजत होती.आणि त्याने तो डाव साधला पत्नीचे आईवडील आणि बहिण कुणीच घरी नाही.आता हिचा खेळ खलास करून टाकू असा विचार गजाननच्या मनात आला त्याने संधी शोधली आणि पत्नीला काही कळण्याच्या आता त्याने तिच्यावर दोन चाकूंनी सपासप वार केले. एक नव्हे दोन नव्हे तब्बल ८ वार त्याने केले.पत्नी पुजा हि रक्ताच्या थारोळ्यात पडली.तिला मरणाच्या अवस्थेत सोडून गजानन हा बाहेर पडला व बाहेर खेळत असलेल्या दोन्ही मुलींना घेतले आणि बाजूला असलेल्या संगम तलावाच्या दिशेने धावत सुटला इकडे जगदंबा नगरमधील लोकांना काही कळण्याच्या आतच गजानने दोन्ही मुलींना घेउन तलावात उडी मारली परंतू देव तारी त्याला कोण मारी तलावाच्या काठी असलेल्या लोकांनी गजानन सह मुलीचे प्राण वाचविले इकडे रक्तबंबाळ अवस्थेत लोकांनी पूजाला जिल्हा रूग्णालयात आणिले.परंतू प्रचंड रक्तस्तोत्र झाल्यामुळे तिचा मृत्यू झाला. आरोपी गजानन याला शहर पोलिसांनी ताब्यात घेतले.त्याने खुनाची कबुली दिली. जिल्हा सत्र न्यायालय बुलढाणा येथे आरोपीविरुद्ध खटला सुरू झाला व आज जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपी याला दुहेरी जन्मठेपेची शिक्षा व १६ हजार पाचशे रुपयांचा दंड ठोकला आहे.पीएसआय सुधाकर गवारगुरू यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेउन वस्तुस्थिती जाणण्याचा प्रयत्न केला.त्यांनी पंच,फोटोग्राफर फॉरेसिक टीम,फिंगरप्रीट एक्सपर्ट यांना बोला-वून घटनास्थळ पंचनामा केला घटनास्थळी दोन रक्ताने भरलेले चाकू,व घटनास्ळावरील रक्ताचे नमुने जप्त केलेले होते त्यानंतर मयताचे वडील सुरेश दत्तू तायडे यांनी पोस्टे घटनेची रितसर तक्रार दिली. त्यानुसार आरोपी गजानन विरूध्द भादवी कलम ३०२ व ४९८ अ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला त्यानंतर तपास अधिकारी गवारगुरू यांनी उर्वरित गुन्ह्याचा तपास करून भा.द.वि. चे कलम ३०२,३०७,३०९,३३६,४९८ अ व आर्म ॲक्ट चे कलम ४.२५ नुसार न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले

### सरकारी वकिल ॲड भटकर यांनी तपासले १५ साक्षीदार...

दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर सदर खटला हा पुराव्याकामी लागल्यानंतर आरोपी विरूद्ध दोषसिद्धी होण्याच्या दृष्टीकोणातून जिल्हा सरकारी वकिल ॲड वसंत भटकर यांनी १५ साक्षीदार तपासले.त्यापैकी घटनास्थळाच्या शेजारी राहणाऱ्या साक्षीदार स्वाती चव्हाण,सविता सावंत,दिनकर पवार, व संतोष खिल्लारे यांनी साक्ष्य महत्वाची राहिली.त्यांनी आरोपीला घटनास्थळावरून जातांना पाहिले होते. तसेच मयत व आरोपी गजानन याची दहा वर्षीय मुलगी श्ती हिने सुध्दा बापाविरोधात साक्ष दिली. एकदरीत घटनास्थळावरून आढळून आलेली परिस्थिती व वैदकीय पुरावे यांची सांगड घालणारी प्रभावी युक्तीवाद ॲड भटकर यांनी केला. आरोपीचे कपड्यावर आणि जप्त केलेल्या चाकूवर आढळलेले रक्त तसेच फिंगरप्रिंट एक्सपर्ट यांनी एका चाकूवर आरोपीचे .फिंगरप्रिंट असल्याचा अहवाल दिला होता.

# कोट्यावधी रुपयांचे वाळूसाठे जप्त महसूल विभागाची मध्यरात्री कारवाई

**वृत्तसंस्था/जालना**

जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनना विरोधात महसूल विभागाने शनिवारी (दि. १८) धडक कारवाई करून अनेक वाहने व वाळूसाठे जप्त केले. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार व निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांच्या नेतृत्वाखाली जालना, बदनापूर, घनसावंगी,जाफ्राबाद या तालुक्यात ही कारवाई करण्यात आली. बदनापूर तालुक्यात सात ते आठ जणाविरुद्ध गुन्हा दाखल करून सुमारे एक कोटी ६२ लाख ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर घनसावंगी तालुक्यात ७५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला व जाफ्राबाद तालुक्यात अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन कुणीही करू नये व कायदा हातात घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश देत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की, अवैध वाळू उत्खनन विरुद्ध नियंत्रणासाठी यंत्रणा सज्ज असून अवैध वाळू उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिता विरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल. असा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.जिल्ह्या-तील सर्व रेती डेपोमध्ये घरकुलासाठी १०%, शासकीय कामांना २०% व बांधकाम व्यावसायिक यांचेसाठी २०% रेती साठा राखीव ठेवला आहे. ऑनलाइन नोंदणी करून रेती उपलब्ध होईल, असे अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी सांगितले.दि. १८ मे रोजी रात्री अंदाजे १२ वाजेच्या सुमारास अंतरवाली राठी येथील दुधना नदीप-त्रातून वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक करणारा हायवा व जेसीबी तहसील कार्यालय घनसावंगीच्या पथकाने पकडून कार्यवाही केली. सदर कार्यवाही करताना महसूलच्या पथकाने अतिशय गुप्तता पाळून अंतर्गत रस्त्याने प्रवास करून वाळू माफियांना सुगावा न लागू देता मोठ्या शिताफिने ही कारवाई केली. अंतरवाली राठी येथील दुधना नदीपात्रामध्ये वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक जेसीबी व हायवाद्वारे केले जात असल्याची गुप्त माहिती तहसीलदार, घनसावंगी यांना मिळाल्यावरून त्यांनी तहसील कार्यालयातील काही तलाठी महसूल सहाय्यक व कोतवाल यांना सोबत घेऊन कारवाई केली. यावेळी जालना तालुक्यातील माळी पिंपळगावच्या बाजूने नदीपात्रात जेसीबी व हायवाचा रस्ता बंद केला व दोन्ही वाहने ताब्यात घेतली. सदर कारवाई तहसीलदार योगिता खटावकर, तलाठी संदीप नरुटे, तलाठी संजय कुलकर्णी , सुरज बिक्कड , महसूल सहाय्यक संदीप सपकाळ, कोतवाल अनिल बर्डे, शेख पाशा व पोलीस कर्मचारी श्री. तिकांडे यांच्या पथकाने केली.बदनापूर तालुक्यातील सायगाव येथील सुखना नदी व दुधना नदी संगम स्थान, मौजे सायगाव गट क्र ७० व ७१ ला लागूनचे नदी पात्र येथे बदनापुर महसुल विभाग व पोलीस स्टेशन बदनापूर यांच्या संयुक्त पथकामार्फत अवैध वाळु उत्खनन कारवाई करण्यात आली. त्यात १ , १ पोकलेन व ३ हायवा जप्त करण्यात आले. तहसीलदार अश्विनी डमरे, पोलीस निरीक्षक सुदाम भागवत, पोलीस उपनिरीक्षक बि. एस. खार्डे व नायब तहसीलदार दळवी, मंडल अधिकारी गोत्रानी व तलाठी निसर्गंध सुदंर्डे व पठान यांच्या पथकाने ही कार्रवाई केली.बुलढाणा जिल्ह्याकडे विनापरवानगी ६ ब्रास वाळू वाहतूक करताना हायवा वाहन मंठा पोलीसस्टेशन येथे जमा करण्यात




आले.दरम्यान, जालना जिल्ह्यामध्ये एकूण ८ रेती डेपोच्या माध्यमातून एकूण १.२० लक्ष ब्रास रेती उत्खननास डेपो धारकांना परवानगी देण्यात आलेली आहे. सध्या उपलब्ध असलेल्या रेती साठ्यानुसार एकूण १३,०३३ ब्रास रेती बुकिंगसाठी उपलब्ध असून त्यापैकी घरकुलासाठी २,१४३ ब्रास , शासकीय प्रकल्पासाठी ५०९३ , खाज-गी प्रकल्पासाठी २६३४ ब्रास व इतर सर्व सामान्य नागरिकांना ३१६३ ब्रास रेती बुकींगसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहे. घरकुलसाठी ५७९ लाभार्थीची नोंदणी झाली आहे. जालना जिल्ह्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस व महसूल विभागाची भरारी पथके स्थापन करण्यात आलेली असून जालना जिल्ह्यात मागील सहा महिन्यांमध्ये एकूण ११९ अवैध उत्खनन वाह-तूक प्रकरणात कारवाई करण्यात येऊन ११६ वाहने जप्त करण्यात आ-लेली आहेत सदर प्रकरणी ३१ गुन्हे दाखल करण्यात येऊन एकूण रुपये १३२ लक्ष दंडात्मक वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.